आपला
# वार्ताहर
महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाच्या वृत्तपत्र समूहाचे दैनिक
मुंबई, वर्ष १६, अंक २४९ ★★★★ रविवार, २० जून २०१० पाने १२, किंमत २.०० रु.




# थ्रीडी कॅमेरा...
## चित्रपटविश्वात क्रांती

चित्रपटाच्या निर्मितीनंतरचे चित्रपटाचे पोस्टप्रोडक्शनही महत्त्वाचे असते. प्रसाद ग्रुप चे नाव या पोस्टप्रोडक्शच्या क्षेत्रात महत्वपूर्ण मानले जाते. नुकतचे प्रसाद ग्रुपच्या वतीने अत्याधुनिक कॅमेरा आणि तंत्रसामुग्री बाजारात आणली. कम्पिलट थ्रिडी प्रोडक्शन या नावाने ही अत्याधुनिक साधनसामुग्रीअसून चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान देणारी असल्याचे प्रसाद ग्रुपचे म्हणणे आहे. टोरन्टो येथील थ्रीडी सीसी या कॅमेरा कंपनीबरोबर कंपनीने टायअप केले असून थ्रीडी ॲक्शन कॅमेरातयार केला आहे. हा इतर थ्रीडी सिस्टिमपेक्षा हलका छोटा । असला तर जगातिल सर्वोत्तम काच यात बसवण्यात आली आहे. चित्रपटाच्या पोस्ट प्रोडक्शनसाठी अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या या थ्रीडी कॅमेऱ्याचे उदघाटन अभिनेता जितेंद्र याने केले.